आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# के. के. वाघच्या यशला जपानमध्ये २५ लाखांचे पॅकेज



**नाशिक :** के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल विभागातील विद्यार्थी तथा चंद्रपूर येथील रहिवासी असलेला यश सुरेश रडके यांची जपान देशातील बहुराष्ट्रीय कंपनीत सर्किट डिझाइन इंजिनिअर म्हणून वार्षिक २५ लाख रुपये पॅकेजवर नोकरी मिळाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. समीर बाळासाहेब वाघ यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर, विभागप्रमुख डॉ. आर. के. मुंजे, ट्रेनिंग प्लेसमेंट अधिकारी डॉ. प्रमोद शहाबादकर व प्राध्यापक उपस्थित होते.

यश रडके याच्या यशामुळे त्याच्या कुटुंबीयांनी आनंद व्यक्त केला. सातत्यपूर्ण मेहनत, शैक्षणिक गुणवत्ता आणि तांत्रिक कौशल्यांच्या बळावर त्याने यश संपादित केलेले आहे, असे प्रतिपादन इलेक्ट्रिकल विभागाचे विभागप्रमुख डॉ. आर. के. मुंजे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर विविध तांत्रिक प्रकल्प, इंटर्नशिप, जपानी भाषा शिक्षणाच्या माध्यमातून आणि महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या मार्गदर्शनामुळे भारतीय तसेच जपानी कंपन्यांमधील रोजगार संधींचा लाभ घेता आला. त्याचाच परिणाम म्हणून जपान देशातील बहुराष्ट्रीय कंपनीत सर्किट डिझाइन इंजिनिअर म्हणून नोकरीची संधी मिळाली, असे यश रडके यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी नवीन कौशल्ये आणि परदेशी भाषा शिकण्याकडे सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी केले.


Powered by: erelego.com